# फळबाग लागवड पूर्व व्यवस्थापन

प्रा. नितीन गवळी
सहाय्यक प्राध्यापक
उद्यानविद्या विभाग

प्रा. प्रफुल्ल डावरे
सहाय्यक प्राध्यापक
उद्यानविद्या विभाग

प्रा. समिक्षा आचरेकर
सहाय्यक प्राध्यापक
उद्यानविद्या विभाग

उद्यानविद्या महाविद्यालय, सरळगाव, ठाणे

कु. मनिषा अपराज
आचार्य पदवी विद्यार्थिनी
मृदविज्ञान व कृषि रसायनशास्त्र विभाग
म.फु.कृ.वि., राहुरी

नविन फळबाग लागवड करण्यापुर्वी त्यांचे व्यवस्थापन योग्य रितीने करणे गरजेचे आहे. बदलत्या वातावरणामुळे फळ बागांचे उत्पादन हे दिवसा गणिक घटत आहे, त्यावर आपण योग्य उपाययोजना केल्यास आपल्याला फळबागेतुन अपेक्षित मुदतीत अपेक्षित प्रमाणात उत्पन्न मिळवणे शक्य होते. त्यासाठीच आपल्याला फळबाग पुर्व नियोजन करणे गरजेचे ठरते.

**जमिनीची निवड:**

- फळबाग व्यवस्थापनामध्ये, फळझाड लागवडीच्या जागेची निवड हि अत्यंत महत्वाची बाब आहे. कारण फळझाडांची लागवड हि साधारणत: कायम स्वरुपाची असते. त्यामुळे जागेची निवड करताना जर गफलत झाली, तर पुढील कालावधी नंतर ती दुरुस्त करणे अवघड होते. म्हणुन जमीन आणि हवामानाबरोबरच जागेच्या निवडीबाबत विचार करणे गरजेचे आहे.
- फळबागेकरिता मातीचे काळजीपुर्वक परीक्षण करणे महत्वाचे आहे. त्याकरिता लागवड करण्यापुर्वी ४ – ५ ठिकाणच्या निवड केलेल्या ठिकाणी १ ते १.५ मीटर खड्डे खोदुन मातीचे परीक्षण करावे. फळझाडांच्या सोयीने सर्वसाधारण फळझाडांना कमीत कमी १ मीटर खोलीनंतर मुरमाचा थर असणारी जमीन आवश्यक असते, तसेच जमिनीतील पाण्याची पातळी २.५ - ३ मीटरच्या वर येणे उपयोगाचे नसते.
- फळझाडांकरिता गाळाच्या उत्तम निचऱ्याच्या जमिनी योग्य ठरतात. जमिनीच्या रासायनिक गुणधर्माचा विचार करता, जमिनीचा आम्ल निर्देशांक ६ ते ७ पर्यंत असावा. त्यामुळे फळझाडांना आवश्यक घटक सहजरित्या उपलब्ध होतात. जमिनीच्या वरवर दिसणाऱ्या रंगरुपावरून निवड करू नये. प्रत्येक फळझाडांची मुळे व एकूण मूळसंभार वेगवेगळ्या प्रकारचा असतो. त्यावरून जमिनीची निवड करणे केव्हाही चांगलेच.
- जमिनीच्या प्रकारानुसार फळझाडांची निवड करावी. हलक्या जमिनीत पेरू, डाळिंब, काकडी, लिंबू, द्राक्षे, पपई, सीताफळ, बोर, आवळा, करवंद, चिंच, जांभूळ, फालसा तर मध्यम जमिनीत आंबा, संत्रा, मोसंबी, चिकु आणि भारी उत्तम निचऱ्याच्या जमिनीत केळी व पपई हे पिक चांगले येऊ शकतात. साधारणपणे जमिनीतील चुनखडीचे प्रमाण १० % पेक्षा जास्त असेल, तेथे आंबा, पेरू, चिकु, संत्री, मोसंबी, लिंबू तत्सम फळांची लागवड घेऊ नये.

**पुर्वमशागत:** जागेची निवड केल्यानंतर प्रथम झाडेझुडपे तोडुन जमिन स्वच्छ करावी. त्यानंतर जमिन उभी-आडवी दोन ते तीन वेळा खोल चांगली कुळवाच्या पाळीने फोडून फळी फिरवुन समपातळीत आणावी. जमिनीत असणारे दगड–धोंडे बाजूला काढून घ्यावे.

**संरक्षित कुंपणाची सोय:**

- नविन लावलेल्या झाडांचे भटक्या गुरांपासून संरक्षण करणे खूपच गरजेच आहे. त्यासाठी निवडलेल्या जागेभोवती चिलार, शिकेकाई, करवंद, गंतुरणी यांसारख्या काटेरी झुड्पाचे कुंपण करावे, जर उपलब्ध नसेल तर काटेरी तारेचे कुंपण करणे फायद्याचे ठरते.
- विविध प्रकारचे उष्ण वारे, थंडीपासून व वादळापासून बागेचे संरक्षण करण्यासाठी अशोका, निलगिरी, शेवरी सारख्या उंच सरळ वाढणाऱ्या झाडांची बागेच्या पश्चिम व दक्षिण बाजुने २ ते ३ फुटांवर लागवड करावी.
- काही वेळा वाऱ्याच्या अडथळ्यासाठी लावलेली झाडे बागेतील मुख्य फळझाडांबरोबर पाणी आणि अन्नद्रव्ये घेण्यासाठी स्पर्धा करतात. हे टाळण्यासाटी अडथळ्यांच्या झाडांपासून १० फुट अंतरावर ३ फुट खोल व २ फुट रुंद खणून त्यामध्ये येणारी या झाडांची सर्व मुळे छाटून टाकावीत. अशाप्रकारे मुळ्या छाटण्याचे काम प्रत्येक वर्षी पावसाळ्यापूर्वी करावे.

**वाणांची निवड:** कोणत्याही पिकाची व्यापारी तत्वावर लागवड करावयाची झाल्यास या पिकांची उत्पादन क्षमता व प्रत उत्तम असणे आवश्यक आहे. यासाठी वाणांची निवड महत्वाची ठरते. विविध विभागासाठी वेगवेगळ्या वाणांची शिफारस केलेली असते. महाराष्ट्राचा विचार केला तर खालील फळझाडांच्या जाती अतिशय चांगल्या प्रकारे वाढतात.

**फळपिके व त्यांच्या सुधारित जाती:**

आंबा (हापुस, केशर, रत्ना, दशहरी, पायरी, नागीण, नीलम, तोतापुरी), पेरू (सरदार, अलाहाबाद सफेदा, ललित, श्वेता), चिकु (कालीपत्ती, क्रिकेट बॉल), सीताफळ (बालानगर, स्थानिक जाती), संत्री (नागपुर संत्रा, नागपुर सिडलेस), मोसंबी (काटोल गोल्ड, न्युसेलर), बोर (कडाका, उमराण, छुहारा, सोनुर-५), चिंच (प्रतिष्ठान नं. २६५, अकोला स्मुती), आवळा (बनारसी, चकय्या, कांचन, कृष्णा, एन.ए. ७), कागदी लिंबू (विक्रम, पिडीकेव्ही लाईम, साई सरबती, प्रमालिनी), केळी (ग्रॅन्ड नाईन, कोकण वेलची).

लागवडीसाठी निवडलेल्या फळझाडांचा कोणता वाण योग्य आहे, त्याची कृषीतज्ञांच्या सहाय्याने निवड करावी आणि तशा वाणांची खात्रीशिर आणि दर्जेदार रोपे,

कलमे कुठे उपलब्ध होतील, याची प्रथम माहिती करून घ्यावी.

## फळबागांची आखणी व अंतर:

• फळबागेसाठी फळझाडांची आणि जागेची निवड झाल्यावर लागवडीसाठी आणखी नियोजन करणे गरजेचे आहे, तेव्हा जमिनीची आखणी करण्यापुर्वी लागवडीची पध्दत ठरवून घ्यावी. फळपिके लागवडीच्या चौरस, षटकोणी, त्रिकोणी व उतार अशा निरनिराळ्या पद्धती आहेत. प्रती हेक्टर क्षेत्रावर बसणाऱ्या झाडांची संख्या वेगवेगळी येईल.

• बहुतेक ठिकाणी फळबाग चौरस पद्धतीने लावतात. या पद्धतीत दोन ओळीतील आणि झाडांमधील अंतर सारखेच असून, ओळी काटकोनात असतात. मशागतीसाठी प्रत्येक फळझाडांचा विस्तार आणि मुळ्यांची वाढ यांचा विचार करून दोन झाडांमध्ये योग्य अंतर ठेवले पाहिजे. जेणेकरून प्रत्येक झाडांची योग्य वाढ होऊन फळधारणेसाठी आवश्यक तेवढा सूर्यप्रकाश आणि हवा मिळेल.

• आखणीच्या दृष्टीने सोपी व सोयीस्कर पध्दत हि चौरस पध्दत असली तरी यामध्ये सुरवातीच्या काळात बरीचशी जागा निरुपयोगी राहते. म्हणुन काही ठिकाणी त्रिकोणी किंवा षटकोणी पद्धतीचा वापर करतात. या पद्धतीमध्ये दोन झाडांमधील अंतर सर्व बाजुने सारखे राहते, त्यामुळे हेक्टरी १५ % झाडे अधिक बसतात. त्यामुळे प्रति हेक्टरी विचार केल्यास उत्पादनही अधिक मिळू शकते.

• विविध झाडांसाठी शिफारस केलेले अंतर, खड्यांच्या आकार व हेक्टरी बसणारी झाडे यांचा विचार करूनच लागवड केल्यास होणारे नुकसानीचे धोके काही अंशी टाळता येतात.

• डोंगर उताराच्या जमिनीवर लागवड करावयाची झाल्यास उताराला आडवे चर खोदुन त्यावर फळझाडांची लागवड विशिष्ठ अंतर घेऊन करावी, यालाच कंटूर लागवड असे म्हणतात.

## खड्डे खोदणे व भरणे:

जेथे फळबागेची लागवड करावयाची आहे, तेथे योग्य त्या अंतरावर चौरस किंवा त्रिकोणी पद्धतीने आखणी करून खड्डे खोदावेत. जमिनीच्या पोता प्रमाणे आणि फळझाडांच्या प्रकारानुसार खड्यांचा आकार ठरवावा. खड्डे खोदण्याचे काम एप्रिल महिन्यापर्यंत पूर्ण करावे. खड्डा खोदतांना वरच्या व खालच्या थरातील माती वेगवेगळी टाकावी. खड्डे चांगले दोन तीन आठवडे उन्हामध्ये तापु द्यावे. जेणेकरून प्रखर सूर्यप्रकाशामुळे खड्ड्यांचे निर्जंतुकीकरण होईल. मे महिन्याच्या दुसऱ्या पंधरवड्यात किंवा जूनच्या पहिल्या आठवड्यात खड्डे परत भरावे. खड्डे मातीने भरताना ते निर्जंतुकीकरण करून वाळलेला पालापाचोळा १५-२० सें मी. थरात भरावा. मातीमध्ये २०-२५ किलो चांगले कुजलेले शेणखत + २ ते ३ किलो गांडुळ खत + २ ते ३ किलो कडुलिंबोळी पेंड + २५ ग्रॅम ट्रायकोडर्मा जीवाणू मिश्रण + १५ ग्रॅम स्फुरद विरघळणारे जीवाणू (PSB) + २५ ग्रॅम अॅझोटोबॅक्टर हे मिश्रण मिसळुन घ्यावे. खड्डा जमिनीच्या वर ५ ते ७ सें मी. उंच भरून ठेवावा म्हणजेच पावसाळ्याच्या सुरवातीबरोबरच लागवड करता येईल.

## कलमे व रोपांची निवड:

• फळबागांपासून काही वर्षाच्या मेहनतीनंतर उत्पन्न देणारे झाड न मिळाल्यास ते तोडुन दुसरे लावणे आर्थिकदृष्ट्या परवडत नाही. फळझाडांची कलमे, रोपांच्या निवडीवर फळांची गुणवत्ता व फळबागेचे एकूण यश अवलंबून असते. म्हणुन बाग लागवडी करता उत्कृष्ट आणि गुणवत्ता माहित असलेली दर्जेदार आणि खात्रिशीर कलमे, रोपे आणावी.

• कृषी विद्यापीठ किंवा शासकीय रोपावाटीकेमधून शक्यतो रोपे आणावीत. शक्य नसल्यास आपल्या माहितीतील शासकीय परवाना धारक रोपवाटिकेतून कलमे, रोपे घ्यावीत.

• कलमांची निवड करताना ती किती उंच आहेत, यापेक्षा ती योग्य त्या जातीच्या मातृवृक्षापासून केलेली आहेत, कि नाहीत या गोष्टीकडे अधिक लक्ष द्यावे.

## फळझाड लागवडीची वेळ:

• फळझाडांची लागवड पावसाळा सुरु झाल्यावर करणे नक्कीच फायद्याचे ठरते. पावसाळा नियमित सुरु झाल्यापासून पंधरा दिवसाच्या आत लागवड करावी. कारण या काळात जमिनीतील परिस्थिती मुळाच्या वाढीस अत्यंत पोषक असते.

• प्रथमतः लागवड करण्यापुर्वी आगोदरच भरून ठेवलेल्या खड्डयावर मध्यभागी कलमाच्या पिशवीच्या दोन्ही बाजूवर उभा काप घ्यावा व मुळाभोवती असलेला मातीचा गोळा न फुटता पॉलिथीन बॅग काढावी.

• मोकळा झालेला गोळा दोन्ही हातात धरून खड्याच्या मधोमध ठेऊन हलकेच दाबावा व मोकळ्या हाताने माती भरून गोळ्याभोवती माती टाकावी. सुरवातीला हाताने व नंतर पायांनी दाबावी, हे करताना झाडाच्या रोपाच्या गोळ्यावर पाय पडणार नाही, याची काळजी घ्यावी. आवश्यक वाटल्यास हलकेसे पाणी द्यावे. रोपाला आधारासाठी पश्चिम बाजूस ६ इंच अंतरावर ४ ते ५ फुट इंचाची बांबूची काठी रोऊन त्याला कलमाचे रोप बांधावे.

अशाप्रकारचे योग्य फळबाग पुर्व व्यवस्थापन केल्यास आपणास लागवडीत हमखास यश मिळेल आणि आपण निर्धारित केलेले उद्दिष्ट मुदतीत व अपेक्षित प्रमाणात साकारण्यात मदत होईल.

(संपर्क: +९१ ८३०८३२३४४५)

★ ★ ★